औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १४.०६.२०१६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २१) रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक १४.०६.२०१६ रोजी (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२१) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वाजता वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त ओम प्रकाश बकोरीया,आयएएस, तसेच नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१३. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१४. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१५. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१६. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
१७. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
१८. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
१९. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२०. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२१. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२२. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२३. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
२४. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
२५. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
२६. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
२७. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग

२८. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
२९. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३०. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
३१. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
३२. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
३३. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
३४. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
३५. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
३६. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
३७. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
३८. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
३९. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
४०. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
४१. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
४२. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
४३. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
४४. स.स. श्री.शेख जफर अखतर
४५. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
४६. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
४७. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
४८. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
४९. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
५०. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
५१. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
५२. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
५३. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
५४. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
५५. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
५६. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
५७. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
५८. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
५९. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
६०. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
६१. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
६२. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
६३. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
६४. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
६५. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे

६६. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
६७. स.स. श्री.सोहेल शकील शेख
६८. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
६९. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
७०. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
७१. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
७२. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
७३. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
७४. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
७५. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
७६. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
७७. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
७८. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
७९. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
८०. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
८१. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
८२. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
८३. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
८४. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
८५. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
८६. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
८७. स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे
८८. स.स.कु.जमादार सायली भागवत

नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

विषय क्रमांक ४४४:-

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मालमत्ता कर सुधारित करणे (टॅक्स रिव्हीजन) व मालमत्ता कर वसुली संदर्भाने कार्यवाही करणे.

सुचक :-श्री.सिताराम इसराम सुरे, श्री.जगताप कमलाकर शामराव

अनुमोदक :- श्री.रावसाहेब राधाकिसन आमले, श्री.गजानन भानुदास मनगटे

चर्चा:-

श्री.नंदकुमार घोडेले :विरशैव समाजाचे अध्यक्ष तसेच जुन्या पिढीतील नामवंत आर्किटेक श्री.विश्वनाथ आप्पा यांचे नुकतेच दुखःद निधन झालेले आहे. सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :यास अनुमोदन देण्यात येते.

मा.महापौर (विरशैव समाजाचे अध्यक्ष तसेच जुन्या पिढीतील नामवंत आर्किटेक दिवंगत विश्वनाथ आप्पा यांचे दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनट स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली.)

स्थायी समितीच्या स.सदस्यांनी दिलेल्या पत्रानुसार तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी व शहराचा विकासात भर पडेल या हेतुने आजची विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यात आलेली आहे. यासंदर्भात स.सदस्यांनी मनपाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आपआपले मत या ठिकाणी नोंदविण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :आजची विशेष सर्वसाधारण सभा बैठक लावली, त्याबद्दल धन्यवाद, महानगरपालिकेमध्ये आजपर्यंत मालमत्ताचे टार्गेट दिलेले आहे ते आजपर्यंत पुर्ण झालेले नाही. या विभागाकडे कायम दुर्लक्ष करण्यात आले. प्रशासनाने पोलीस आयुक्त कार्यालयात वसुली संदर्भात सुनावणी ठेवली होती. याची गरज काय होती? याचा खुलासा करण्यात यावा. यामुळे भितीयुक्त वातावरण निर्माण झालेले आहे.

श्री.राजु शिंदे :मा.पोलीस आयुक्त तसेच महानगरपालिका आयुक्त यांनी मानवी मुलभूत हक्काची पायमल्ली केलेली आहे. ह्युमन राईटस् कमीशनकडे दोन्ही आयुक्तांची तक्रार केलेली आहे. पोलीस आयुक्त कार्यालयात शहरातील नागरीकांना, थकबाकीदारांना बोलावुन बैठक बोलविण्याची काय आवश्यकता होती.

श्री.रेणुकादास वैद्य :स.सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो शहरात गेल्या आठ दिवसापासून कायम चर्चेमध्ये आहे. दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तो चुकीचा आहे. याचा निषेध करण्यात येतो. त्याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.अय्युब जहागीरदार:किती रक्कम किती वर्षापासून थकबाकी होती, खुलासा करण्यात यावा.

श्री.राजु शिदें :पोलीस आयुक्त कार्यालयात बैठक बोलविण्याची आवश्यक काय?

श्री.जगताप भाऊसाहेब :पोलीस आयुक्त यांचेकडे नागरीकांना गुन्हेगारासारखे बोलविण्यात आले. नागरीक नगरसेवकांना विचारणा करत आहे. कर आकारणी करण्याचे काम कुणाचे आहे? खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :मीटींग कशासाठी बोलावली हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. प्रशासनाचा असा निर्णय होता दहशतीचे वातावरण निर्माण करायचे नव्हते. पोलीस आयुक्तांकडे विनंती केली की, 100 कोटी रूपये थकबाकी आहे. त्याकरीता पोलीस आयुक्त यांचेकडे बैठक बोलावण्याचे प्रशासनाचे मत होते.

श्री.रेणुकादास वैद्य :पोलीस प्रशासनाकडे कशासाठी बैठक बोलविण्यात आली. महानगरपालिकेचे हॉल, सभागृह बैठकीसाठी आहेत.

श्री.राजु शिंदे : प्रशासन म्हणजे कोण? सकाळी 9.30 वाजता बैठक बोलावली होती त्या बैठकीला न येता पोलीस आयुक्त यांचे बैठकीला जाणे पसंद केले.

मा.महापौर :मा.आयुक्त खुलासा करत आहे. खुलासा ऐकुण घ्यावा.

मा.आयुक्त :जवळपास 100 कोटी रूपये थकबाकी येणे बाकी आहे. मनपाची टिम त्यांचेकडे जातात. त्या ठिकाणी धमकावण्याचे प्रकार घडतात. एका प्रकरणात गन काढण्यात आली होती. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे सेफ्टीची/सुरक्षेची जबाबदारी प्रशासन म्हणुन माझी आहे. एखादी घटना घडली असती, हा भाग आहे सेक्युरिटीचा, कर्मचारी वसुली करीता जातात तेव्हा सेक्युरिटी असायला हवी. यावरून मी विनंती केली होती पोलीस आयुक्तांना थकबाकीदारांबाबत एक विचारविनिमय बैठक महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसमवेत घेण्याबाबत ठरले होते. हा काही दहशत निर्माण करण्याचा हेतु नव्हता. कुणाविरूध्द कारवाई करण्याचा हेतु नव्हता. पोलीस आयुक्तांनाही सांगण्यात आले होते आमचा उद्देश विचारविनिमय करण्याचा आहे. जो कर्मचारी वसुलीकरीता जाणार आहे, त्यास संरक्षण प्रदान करणे हा आहे. राहीलेला भाग म्हणजे बैठक पोलीस आयुक्तालयात का घेण्यात आली, हा काही विषय नाही, पोलीस आयुक्तांलयात झाली काय आणि महानगरपालिकेमध्ये झाली काय हा काही इश्यु नाही. यामध्ये कुठल्याही प्रकारचा दहशत निर्माण करण्याचा हेतु नव्हता.

श्री.राजु शिंदे :अधिकाऱ्याने नागरीकावर बंदुक काढलेली आहे. मा.आयुक्त यांचे दालनामध्ये करदात्यांना बोलावुन सुनावनी घेवुन त्यांच्या समस्या, अडचणी ऐकुण घेऊन त्या समस्यांची निराकरण करणे आवश्यक होते. मा.आयुक्तांचा अधिकार मोठा आहे. करदाता कर भरत नसल्यास कायद्याप्रमाणे अनेक उपाय सांगीतलेले आहे त्याचा अवलंब करणे आवश्यक होते, पोलीसांची दहशत निर्माण करून वसुली करणे हे कुठल्याही कायद्यात नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :नागरिकांना दहशत निर्माण करणे ही बाब आपण गांर्भीयाने घेतली पाहिजे. महानगरपालिका अधिनियमात पोलीस बंदोबस्त घेऊन कार्यवाही करावी अशी तरतुद आहे. परंतु त्याचा अशा रितीने वापर करणे चुक आहे. यापुढे ही बाब पुन्हा घडु नये, अशी मी आपणास विनंती करतो.

श्री.राजगौरव वानखेडे :थकबाकी वसुल करण्याचे काम पोलीस आयुक्त यांचे आहे का? ते मनपा आयुक्तांचे आहे. 100 कोटी थकबाकी वसुल करण्याचे काम महानगरपालिकेचे आहे. मागील सहा महिन्यांपासून महानगरपालिका

पोलीस प्रशासन चालवते का की, महानगरपालिका चालवते हा प्रश्न पडलेला आहे. समांतर, टॅक्सच्या प्रकरणात पोलीस प्रशासन मध्यस्ती करत आहे. मग आयुक्त, महापौरांचे काम काय? पदाधिका-याशी चर्चा न करता पोलीस आयुक्तालयात बैठक बोलावली. महानगरपालिका आयुक्त यांनी केलेला खुलासा समाधानकारक नाही. टॅक्स थकबाकी बाबत प्रशासनाच्या कोणत्या अधिकाऱ्यांवर का कारवाई करण्यात आली नाही. मालमत्ता कर वसुलीसाठी प्रशासन नागरीकांपर्यंत जात नाही. विशिष्ट नागरीक जे टॅक्स भरतात. त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. सभागृहाने याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

श्रीमती सत्यभामा शिंदे :31 मार्च पुर्वी मनपाकडे चेकद्वारे रक्कम भरलेली आहे परंतु सदरील चेक वटलेले नाही. यावर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली? 12 महिने वसुली मोहीम चालविण्यात यावी.

श्री.नंदकुमार घोडेले :झालेला प्रकार हा निंदनीय आहे. महानगरपालिका स्वायत्त संस्था आहे. अशा प्रकारच्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये. नागरीकांना पोलीस आयुक्तांलयात वसुलीच्या बैठकीसाठी जाण्यासाठी दहशत निर्माण झाली होती. नागरीक नगरसेवकांना विचारणा करत आहे. प्रशासनाने पोलीस प्रशासनाची मदत घेऊन कारवाई करणे योग्य आहे. तत्कालीन करमुल्य निर्धारक व संकलक श्री.शिवाजी झनझन यांनी नागरीकांच्या घरांना कुलूप लावुन वसुली केलेली आहे. वसुली करणारे चांगले अधिकारी आहेत. त्याची पुनरावृत्ती होऊ नये.

श्री.राजु शिंदे :या शहराच्या प्रत्येक नागरीकाची जाहीर माफी मागावी. जे कृत्य केलेले आहे. ते चुकीचे केलेले आहे. महानगरपालिकेच्या मालकीच्या ठिकाणी बैठक आयोजित करायला पाहिजे ते केले नाही.

श्री.विकास एडके :आठ दिवसात ज्या घडामोडी घडल्या त्यामुळे टॅक्स विभाग हा फेल झालेला आहे. ज्या लोकांना बोलावले होते ते डिफॉल्टर होते.

श्री.राजगौरव वानखेडे :ते डिफॉल्टर नव्हते, प्रशासनाने वसुलीसाठी त्यांच्यापर्यंत पोहचलेलेच नाही.

(याच वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

मा.उपमहापौर :100 लोकांना त्या ठिकाणी कोणत्या निकषाच्या आधारे बोलविण्यात आले. त्याचा खुलासा करावा.

मा.महापौर :उपआयुक्त यांनी खुलासा करावा.

श्री.विकास एडके :मा..पोलीस आयुक्तांकडे जी बैठक बोलावली ती चुकीची नाही. महानगरपालिकेजवळ फंड नसेल तर विकास काम करू शकणार नाही. मा.आयुक्तांचे अभिनंदन करू इच्छितो की, त्यांनी फंड कशा रितीने जमा करू शकतो, आपला उद्देश त्या ठिकाणी मीटींग

बोलविण्याचा चांगला होता. त्यातुन काहीतरी आऊटपुट निघायला पाहिजे.

श्री.अफसर खान :स.सदस्यांचे म्हणने ऐकुण घ्यावे.

मा.महापौर :ती बैठक पोलीस आयुक्तलयामध्ये झाली ती योग्य होती का?

श्री.विकास एडके :उद्देश चांगला होता.

मा.महापौर :मागील वर्षीची भरणा केलेल्या नागरीकांनाही त्या ठिकाणी बोलविण्यात आले.

श्री.राजु शिंदे :100 टक्के थकबाकी असली तरीही पोलीस आयुक्तलयाकडे बैठक बोलवता येत नाही. कायद्यामध्ये यासंबधीची तरतुद नाही.

श्री.अय्युब जहागीरदार:पोलीस आयुक्तालयाकडे बैठक घेतली त्याच्याशी आम्हीही सहमत नाही. सभागृहाची मान्यता घेऊन ही बैठक घ्यायला पाहिजे होती. हे सर्व मोठमोठे थकबाकीदार आहेत त्यांचेकडे ही थकबाकी आहे. म्हणुन पोलीस आयुक्तांची मदत घेतली. श्रीमंत नागरीकांकडे 300 कोटी रूपये बाकी आहे. हा पैसा मनपाच्या तिजोरीत येणार आहे मनपाचा फायदा होण्यासाठी हे केलेले आहे.

श्री.राजु शिंदे :सरसगट नोटीसा देण्यात आलेले आहे. किराडपुरा, अशोकनगर व इतर ठिकाणच्या नागरीकांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये श्रीमंत नागरीक नाही. सर्वसामान्य नागरीकांनाही नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. मनपामध्ये हेअरिंग घेऊन निर्णय घ्यायला पाहिजे. महानगरपालिकेला कायद्यानुसार सिल करण्याचे जप्त करण्याचे अधिकार आहे.

श्री.मतीन शेख :ज्यांच्या काळात ही थकबाकी आहे त्यांचेवर कारवाई करण्यात यावी.

कु.यशश्री बखरिया :उद्देश जरी चांगला असला तरी प्रशासनाकडुन चुक झालेली आहे. महानगरपालिका वसुलीकरीता सक्षम राहीलेली नाही. असा समज नागरीकांमध्ये झालेला आहे. त्या ठिकाणी कर्मचारी वाढवावेत, त्यांना ट्रेनिंग देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :पोलीस आयुक्तांकडे जी बैठक लावली ती चुकीची आहे. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. मा.आयुक्त यांना ॲक्टनुसार अधिकार आहे. काही वर्षापुर्वी स्पेक कंपनीने मालमत्तांना कर आकारणी केली होती. त्यातील कित्येक प्रकरणात चुकीची कर आकारणी केलेली आहे. स्पेकने मालमत्ता कर लावण्यासंदर्भात घोटाळा केलेला आहे. हैद्राबाद येथे 20 कर्मचाऱ्यांची टिम तयार करून कार्यवाही करण्यात येते, आपल्या महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांची टिम तयार करून सर्वे करून वसुली करू शकतो, 3 लाख 37 हजार मालमत्ता शहरात आहे. १ लाख 87 हजार मालमत्तांची नोंद मनपामध्ये आहे. इतर मालमत्तांना कर लावल्यास महानगरपालिकेला उत्पन्नाचे चांगले

साधन निर्माण होईल. टिमवर्क करून काम केल्यास तसेच एका टिमला एक अभियंता नेमुण देण्यात यावा. वर्षाकाठी मालमत्तेपोटी 400 कोटी रूपये येतील. मालमत्तेचा गाडा चालेल.

मा.महापौर :आपल्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

श्री.राजु शिंदे :एमएसइबी कडून ग्राहकांची लिस्ट मागविण्यात यावी. त्यानुसार मालमत्ता सर्वे करून कर लावण्यात यावा.

श्री.अफसर खान :शहरात भव्य इमारत, अपार्टमेंट उभे राहत आहे. त्याचा सर्वे होणे आवश्यक आहे. शहर चोहुबाजूने वाढलेले आहे, त्या सर्व मालमत्तांना टॅक्स लावण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे :टॅक्सचे कर्मचारी एक ते दिड तास काम करतात. अधिकाऱ्यांचे त्यांचेवर लक्ष नाही. विवादीत/चुकीचा लावलेला मालमत्ता टॅक्सचा प्रश्न वन टाईम सेटलमेंट करून सोडविण्यात यावा.

श्रीमती :वार्डामध्ये सर्व नागरीक टॅक्स भरतात. परंतु सुविधा मात्र मिळत नाही. टॅक्स भरणा करण्यासाठी जातात, त्यावेळी जुन्या पावत्या मागीतल्या जातात असे का? मनपाची सिस्टीम अपडेट नाही का? सिस्टीम अपडेट पाहिजे जेणे करून टॅक्स भरणा करण्यात भरणा पडेल. 200 कोटी थकबाकी का राहीली? याचा तपास करण्यात यावा. काही जागांना जुन्या पध्दतीने टॅक्स लावला जातो. त्याचा सर्वे करण्यात यावा.

श्रीमती भालेराव आशा :मोठ मोठे शॉप/दुकाने आहेत त्यांना कम्पलीशन घेतलेले नाही. लालदास मंगलदास सोनी यांनी बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही.

श्री.नितीन चित्ते :मागील आठ दहा दिवसांपासून सामान्य नागरीक दहशतीच्या वातावरणात वावरत आहेत. प्रशासनाने पोलीस आयुक्तांची मदत घेतलेली आहे. म्हणजे प्रशासन कुठेतरी कमी पडत आहे. याबाबत आत्मपरिक्षण करणे आवश्यक आहे. समांतर, टॅक्सच्या बाबत पोलीस आयुक्तांची मदत घेण्यात येते. पोलीस आयुक्त यांची मदत घेण्याअगोदर कर्मचाऱ्यांमध्ये असलेल्या उणीवा लक्षात घेणे गरजेचे आहे. बळीराम पाटील आणि पार्वती कन्या विद्यालय यांना लाखो रूपयाचा टॅक्स लावण्यात आला होता, परंतु प्रकरण न्यायालयात गेल्यावर ते टॅक्स काही हजारात आलेला आहे, त्यामुळे खरी थकबाकी किती? याचा तपास घेण्यात यावा. कर नोंदीच्या रजिस्टरचे जुने पाने फाटलेल्या अवस्थेत आहेत. 40 टक्के मालमत्ता मिसींग आहेत. त्यास कोण जबाबदार आहे. सन 2012 रोजी टॅक्सचे संगणकीकरण झालेले आहे. एफ-104 सुरू झाले. तो डाटा संगणकामध्ये टॅक्सच्या नोंदी अपडेट नाहीत. टॅक्सच्या नोंदी दुबार झालेल्या आहेत. त्यामुळे वसुलीचा आकडा वाढत चालला आहे. चुकीच्या पध्दतीने लावण्यात

आलेल्या टॅक्सच्या बाबत रिव्हियु घेण्यात यावा. टॅक्सचे प्रकरण निपटारा करण्यासाठी कमीटी तयार करण्यात यावी. तत्कालिन आयुक्त यांनी कमीटी तयार करण्यासंदर्भात सहमती दर्शविली होती, टॅक्सच्या बाबतीत नगरसेवकांना विनंती करा ते सहकार्य करतील. टॅक्स वसुली करण्यासाठी पोलीस आयुक्तांची मदत न घेता पदाधिकारी यांना विश्वासात घ्यावे. जेणेकरून वसुली वाढेल.

श्री.मोहन मेघावाले :प्रशासनाने आपल्या अधिकारामध्ये काम करणे आवश्यक आहे. पोलीस आयुक्तालयात बैठक घेतली ती योग्य नाही. टॅक्स वसुल करण्याच्या मनपामध्ये वेगवेगळया पध्दती आहे. जनतेला वेठीस धरून वसुली करू नये. जनतेत दहशत निर्माण करून काम करण्यात येऊ नये, सर्व स.सदस्य, पदाधिकारी प्रशासनाच्या सोबत आहे. वार्डामध्ये वसुली संदर्भात लागणारी सर्व मदत करण्यास नगरसेवक तयार आहे.

श्री.गजानन बारवाल :एक कमीटी बनवुन हेअरिंग घेण्यात यावी.

श्री.राजु शिंदे :जी चुक झालेली आहे, त्याबाबत माफी मागावी.

मा.महापौर :वसुलीबाबत उपायाबाबत चर्चा करण्यात यावी. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता काय झाले त्यापेक्षा भविष्यासाठी काय केले पाहिजे ते पहावे.

श्री.राजु शिंदे :अधिकाराचा दुरपयोग होत आहे. मा.महापौरांच्या मीटींगला आलेले नाही. शहरात जे वातावरण निर्माण झालेले आहे वर्तमानपत्रामध्येही सातत्याने बातम्या येत होत्या, जी चुक झालेली आहे, ती मान्य करावी. माफी मागावी.

मा.महापौर :पोलीस आयुक्तांलयात मीटींग लावु नये, वसुली संदर्भात चर्चा करू, थकबाकीचे प्रकरण तडजोडीने सुटले पाहिजे. 285 कोटीची थकबाकीमध्ये डबल कर तसेच अशा प्रकारचे अनेक केसेस आहे. यावर उपाय सुचविण्यात यावे.

श्री.जहॉगीर खान :थकबाकी बाबत आपल्या कर्मचाऱ्यांशी संगणमत करून जुना टॅक्स ऐवजी नवीन टॅक्स लावुन भरला जातो.

श्रीमती शेख समिना :माझ्या वार्डात एक जमीन अनेक जणांना विकली आहे. त्यावर 2 ते 3 लाख रूपये होता आता नविन कर लावलेला आहे. यामध्ये भष्ट्राचार झालेला आहे. हा भ्रष्टाचार थांबविण्यात यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :मालमत्ता कराबाबत चर्चा चालु आहे, टॅक्सबाबत पोलीस आयुक्त येथे मीटींगसाठी बोलावली होती, महापौरांना पदाधिकाऱ्यांना मीटींगबाबत तसेच मीटींगच्या विषयाबाबत सविस्तर माहिती मिळायला पाहिजे, महापालिका स्वायत्त आहे. अधिनियमामध्ये स्पष्ट लिहिलेले आहे की, ज्या ठिकाणी प्रशासनाला पोलीसांचे संरक्षण लागेल त्या ठिकाणी पोलीसांनी संरक्षण दिले पाहिजे. असे कायद्यात दिलेले आहे. कोणत्या

नियमात त्यांच्या कार्यालयात बैठक आयोजित केली? नियमात तशी तरतुद असेल तर कुणाचीही याबाबत हरकत नाही. आजपर्यंत किती मालमत्ताधारकांनी अडथळा आणलेला आहे. जास्तीचा कर लागल्याचे अनेक प्रकरणे प्रलंबीत आहे. वादग्रस्त, विवादित प्रकरणात लक्ष देण्यात यावे. प्रशासनाकडुन चुक झालेली आहे, प्रशासनाने दिलगीरी व्यक्त करावी. सर्वे करून नविन टॅक्स बाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.

श्रीमती शेख समीना :अनाधिकृत मंगलकार्यालयाबाबत अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला आहे, परंतु माहिती दिलेली नाही. मोबाईल टॉवर्सकडुन वसुली केलेली नाही, छोटया मालमत्ताधारकांकडुन वसुली करण्यात येते व मोठ-मोठया मालमत्ताधारकांना सोडण्यात येते.

श्री.शेख अब्दुल ताहेर :पैठणरोडवर शेकडो अपार्टमेंट आहेत, परंतु त्याठिकाणी एक जणही टॅक्स भरत नाही, एका निवृत्त न्यायाधिशाने स्वत:हुन टॅक्स भरण्यासाठी महानगरपालिकेत आले व टॅक्स लावुन घेतला, परंतु त्यांच्या आजुबाजूच्या सर्व नागरीकांनी त्यांना वेड्यात काढले, अशा प्रकारची मानसिकता शहरातील नागरीकांची झालेली आहे.

मा.उपमहापौर :मा.आयुक्तांना काही प्रश्न आहेत त्याचा खुलासा करण्यात यावा. 290 कोटीची थकबाकी नेमकी कोणती आहे, कोणत्या वार्डातील आहे, गेल्या 15 दिवसापासून कोणती उपाययोजना आहे.दिनांक 10.06.2016 रोजी विषय पत्रिका निघालेली होती. सदरच्या मीटींगच्या माहिती बाबत प्रशासनाची तयारी नव्हती का? मालमत्ता वसुलीसाठी प्रशासन काय करते? याबाबत पदाधिकाऱ्यांना माहिती देणे आवश्यक होते. वार्ड निहाय वसुलीबाबत कळविण्याबाबत सांगण्यात आले होते परंतु माहिती दिली नाही. स.सदस्यांना यामध्ये invole केल्यास अधिकारी यांची दुकानदारी बंद होतील. आमची इच्छा आहे की, वसुली झाली पाहिजे, अधिकाऱ्यांची इच्छा नाही की, ती वसुली व्हावी. एका सामान्य नागरीकांला गेल्या 5 वर्षापासून 1100 रूपये टॅक्स लागत आहे, बावीस्कर नामक कर्मचारी त्या ठिकाणी जावुन Assessment करण्याबाबत सांगण्यात येते, सदरील व्यक्तीने Assessment करणे संदर्भांत होकार दिल्यावर श्री.बावीस्कर याने 20000/- रूपये मागीतले. 20000/- रूपये दिले नाही. म्हणुन आता 12,500/-ची नोटीस देण्यात आली. अशा पध्दतीने कामकाज चालते, स.सदस्यांना शहराचा विकास पाहिजे. विकास कामाबाबत लेखा विभागातुन पैसे नाही म्हणुन सांगीतले जाते. वसुली संदर्भांत सर्व स.सदस्य प्रशासनासोबत आहे परंतु आम्हाला Involve करून घेत नाही. पोलीस आयुक्तालयात मीटींगला 100 नागरीकांना बोलावले त्यामध्ये कोणते निकष लावले. थकबाकीसाठी कोण जबाबदार आहे याचा शोध घ्यायला

पाहिजे. कॅनॉट प्लेस येथे का दुकानांना लॉक लावण्यात येते. ज्या अधिकाऱ्यांची वसुली संदर्भात Involve करून घेण्याची इच्छा नाही. त्यांच्या विरूध्द कडक कारवाई करण्यात यावी. कित्येक दिवसांपासून हे बोलत आहे. वार्ड-वाईझ याद्या मागविण्यात येतात. ती का देण्यात येत नाही. प्रशासनाने टॅक्स वसुलीचा विषय तेवढयाच गंभीरतेने घ्यावा, ज्या कर्मचाऱ्यांमुळे वसुली थांबलेली आहे, कित्येक वर्षापासून तोच कर्मचारी टॅक्स लावतात त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. सभागृह प्रशासनाच्या बाजुने आहे. शहराच्या विकासासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

श्री.राजु शिंदे :पोलीस आयुक्तालयात मीटींग घेतल्यावर किती वसुली झाली ? खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :मालमत्ता कराचे टार्गेट आणि वसुली तसेच स.सदस्य यांनी मांडलेल्या मुद्याबाबत तसेच नोटीस देण्याबाबत कोणते निकष होते, वाड-वाईझ टार्गेट याबाबत माहिती देण्यात यावी.

करमुल्य निर्धा. व संक.:पोलीस आयुक्तालयात जी बैठक बोलावली होती, त्यामध्ये व्यवसायीक थकबाकीदार तसेच ज्यांचे एक लाख रूपयाच्या वर थकबाकी असलेल्या थकबाकीदारांना बैठकीसाठी बोलावले होते.

श्री.रेणुकादास वैद्य :पोलीस आयुक्तालयात जी बैठक बोलावली ती योग्य होती का?

करमुल्य निर्धारक व संकलक:जे व्यवसायीक आहेत तसेच ज्यांची थकबाकी एक लाखाच्या वर आहेत. त्यांना नोटीसा देण्यात आल्या होत्या, वार्ड अधिकाऱ्यांना तशा सूचना देण्यात आल्या होत्या, वार्ड-वाईझ नोटीस इश्यु करण्यात आलेल्या आहेत, 700 जणांना नोटीस दिलेल्या होत्या. सर्व व्यापारी आणि थकबाकीदार यांना बोलविण्यात आलेले होते.

उपमहापौर :कोणत्या निकषाच्या आधारे थकबाकीदारांना बोलविण्यात आले होते.

महापौर :निकष आणि पध्दत सांगण्यात यावे.

श्री.कैलास गायकवाड :चेक बाऊन्स झालेल्यांना नोटीस दिली का?

उपमहापौर :निकष कोणते लावले, किती वर्षापासून थकबाकीदार होते याची माहिती देण्यात यावी. नसता सभा तहकूब करण्यात यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :मोठया थकबाकीदारांची यादी होती का?

मा.महापौर :मीटींग लावण्यापुर्वी थकबाकीदारांवर कारवाई केली होती का? खुलासा करण्यात यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :थकबाकीदारां संदर्भात कोणती वर्गवारी केली होती, निकष कोणते ठरविण्यात आले,

करमुल्य निर्धारक व संकलक: एक लाखाच्या वर तसेच ते व्यावसायिक थकबाकीदार आहेत त्यांना मीटींगसाठी बोलविण्यात आले होते. वार्ड ब मधील एक प्रकरणात

सन 2015-16 चा कर भरलेला होता. त्यास बोलविण्यात आले होते, चुकून त्यांना बोलविण्यात आले होते.

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.आयुक्त महोदय यांना या संदर्भात व्यवस्थित माहिती दिली गेली नाही. गेल्या 8 महिन्यांपासून सांगण्यात येत आहे की, संगणकीकरण करण्यात यावे. थकबाकी कधीपासून बाकी आहे याची माहिती मिळेल, एमएसईबीची यादी तसेच 50 हजारांच्या वर थकबाकीदार असलेल्यांची यादी मागवलेली आहे परंतु ती देण्यात आली नाही. स.सदस्यांचे प्रश्नांचे निराकरण झाले पाहिजे.

मा.उपमहापौर :वार्ड अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात यावी, कुणाला मीटींगसाठी बोलावले.

श्री.राजगौरव वानखेडे :वसुलीसाठी थकबाकीदारांकडे वार्ड अधिकारी किती वेळेस गेले, कोणते प्रयत्न केले खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :प्रकरणात 5 ते 10 टक्के त्रुटी असु शकतात. चुकीचा टॅक्स लावलेला आहे. त्या संदर्भात वार्ड निहाय कर अदालत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. काही प्रकरणांचे निराकरण झालेले आहेत काहींचे निराकरण करण्यात येत आहे. निवडणूक वार्ड निहाय थकबाकीची माहीती सर्वांना देण्यात येणार आहे. येत्या दहा दिवसामध्ये माहीती क्लिअर करण्यात येणार आहे. शहरातील मालमत्तांचे टॅक्स ॲसेसमेंट हे 1989 मध्ये झालेले आहेत. त्यानंतर ॲसेसमेंट झालेले नाही. सध्या 1 लाख 87 हजार टॅक्स धारक आहे. त्यामध्ये जमीन, व्यवसायीक, घरगुती मालमत्ता आहेत. विशेषत: गुंठेवारीचा विषय आहे. गुंठेवारी भागाबाबत मा.महापौर यांचेशी चर्चा चालू आहे. वार्ड अधिकाऱ्यांकडून टॅक्स संदर्भात गंभिर तसेच जानुन बुजून चूक केली असेल तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच इतर किरकोळ चुका झालेल्या असतील तर त्या वार्ड कार्यालय स्तरावरून दुरूस्त केल्या जातील.

श्री.सिताराम सुरे :वार्ड-ब मध्ये श्री.गंगाधर बमणे नामक कर्मचारी याने अनेक नागरीकांकडुन मालमत्ता कर भरून घेतो म्हणुन पैसे घेतलेले आहे परंतु त्या पैशांचा भरणा मनपामध्ये केलेली नाही, तसेच त्यांना टॅक्स पावतीही दिलेली नाही,

श्री.भगवान घडमोडे :सभा 10 मीनीटांसाठी तहकूब करण्यात यावी.

मा.महापौर (10 मीनीटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.)

(सभा सुरू)

श्री.गजानन बारवाल :नम्रपणे सभागृहास विनंती करायची आहे. थकबाकीदाराची मीटींगचा विषय शहरात खुप चर्चेचा झालेला आहे. त्यावर पडदा पडणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रशासनाला आदेशीत करावे की, या नंतर अशा

प्रकारची चुक त्या ठिकाणी जावुन करणार नाही. असे आदेशित करण्यात यावे तसेच ज्या ठिकाणी आवश्यक पोलीस संरक्षण लागणार आहे. त्या ठिकाणी ते घेण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे :मालमत्ता कराविषयी चर्चा चालू आहे. पोलीस आयुक्तालयात मीटींग लावली त्या बद्दल चर्चा चालू आहे. पोलीस आयुक्तालयात मीटींग लावली. मा.आयुक्तांचा हेतु प्रामाणिक होता, परंतु पध्दत चुकली आहे. दुसरी बाजू म्हणजे वसूली आवश्यक आहे. वसुली झाली पाहिजे. 290 कोटी थकबाकी बाकी आहे. वसुलीच्या बाबतीत अधिकारी/कर्मचारी जी पध्दत वापरतात ती चुकीची आहे. चुकीची डिमांड नोट देणे, पैसे भरणा करण्यासाठी आलेल्या नागरीकांना चांगली वागणूक न देणे, असे अनेक कारणे या ठिकाणी झालेले आहेत. 290 कोटीची थकबाकी अनेक वर्षापासून थकीत आहे. वसुली नाही, विकास कामे नाही अशा द्विधा मन:स्थितीत असतांना सर्व स.सदस्य, पदाधिकारी आणि प्रशासनाने मिळुन प्रयत्न करायला पाहिजे. यापुढे सी.पी.ऑफिसला मीटींग बोलावु नये. कायद्यानुसार थकबाकीदारांना बोलावुन, त्यांची सुनावणी घेवुन, शास्ती लावु शकतो, नागरीकांना सुलभ होईल अशी पध्दत वापरली पाहिजे, एका वार्डात चार दिवस मोहिम घ्यावी, सीपी ऑफिसला मिटींग घेणे योग्य नाही. मा.महापौरांना विनंती की, वसुली वाढवावी व योग्य रितीने वसुली झाली पाहीजे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहराच्या विकासासाठी वसुली वाढली पाहिजे, वसुलीसाठी महानगरपालिकेला अधिकार आहेत, स्वतंत्र कर्मचारी आहेत. मनपाच्या कायद्यामध्ये तशी तरतुद आहे. अशा सर्व पध्दतीचा वापर करून वसुली वाढवली पाहीजे. सर्व सभागृह प्रशासनाच्या बरोबर आहेत. परंतु पोलीस आयुक्तालयात मीटींग घेणे हे असंवेदनशील कृत्य महानगरपालिका प्रशासनाने करू नये. अशी विनंती आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :सभागृहात जी चर्चा झालेली आहे त्यानुसार प्रशासनाला समज देण्यात यावी. असे आदेश देण्यात यावे.

मा.महापौर :महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडावी, त्या दृष्टीने गेल्या 8 दिवसापासून शहरात जे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच आज जी बैठक लावली आहे त्या मध्ये सर्वच सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत. ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत त्यामध्ये नागरीकांच्या त्या भावना आहेत. पध्दत चुकलेली आहे. वसुलीचे निकष काय याचा सविस्तर खुलासा झालेला नाही. अशा नोटीसा दिल्या गेल्या की, थकबाकीमध्ये त्यांचेकडे नव्हती. असे प्रकार घडलेले आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे हा हेतु होता, पोलीस आयुक्तांनी मदत केली, परंतु सभागृहाच्या स.सदस्यांच्या भावने सोबत मी आहे. शहरातील

वातावरण चांगले राहावे, वसुलीचे अधिकार मनपाचे आहेत. मागील 10 ते 15 वर्षापासुन थकबाकी आहे. वसुलीत कुठेतरी कमी पडलेलो आहे. स.सदस्यांना विश्वासात घेवुन निर्णय घ्यायला पाहिजे. नागरीकांमध्ये भितीचे वातावरण नसावे, एकमेकांना विश्वासात घेवुन कामे करण्यात यावी. जेणे करून शहराच्या विकासाकरीता प्रयत्न करू शकतो. महानगरपालिकेचे स्वत:चे सभागृह आहेत त्या ठिकाणी बैठका घेण्यात याव्यात. खेळीमेळीच्या वातावरणात प्रशासन व नगरसेवक एकत्रीत कामे करून उत्पन्न वाढवण्यात यावेत. वार्डामधील थकबाकीची माहिती स.सदस्यांना देण्यात यावी. वादग्रस्त, प्रलंबीत कर प्रकरणाबाबत हेअरिंग घेवुन नगरसेवकांना विश्वासात घेवुन बैठक घेण्यात यावे. महानगरपालिकेतच व मनपाच्या जागेच्या मालकीच्या जागेतच या पुढे बैठका घेण्यात याव्यात.

श्री.गजानन बारवाल :सी.पी.ऑफिसमध्ये बैठका घेण्यात येवु नये.

श्री.राजु शिंदे :सर्व सभागृहाच्या भावना आहे. मीटींग सी.पी.ऑफिसमध्ये न घेता आपल्या कार्यालयात घेण्यात याव्यात. सभागृहाचा मान ठेवण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :आम्ही कुठल्या प्रकारचा दबाव आणत नाही.

मा.महापौर :सर्व सदस्यांच्या भावना सूचना प्रशासनाला सांगीतलेल्या आहे, प्रशासनाला योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

<u>ठराव :-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मालमत्ता कर सुधारित करणे (टॅक्स रिव्हीजन) व मालमत्ता कर वसुली संदर्भाने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.महापौर यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद